बीड । मंगळवार
२४.१२.२०२४
वर्षे : ४ अंक : २५७
किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक
# मराठवाडा पत्र
संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे




marathwadapatra.com dailymarathwadapatra2021@gmail.com RNI : Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post : Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 

# स्व.देशमुखांना न्याय देण्यासाठी जिल्हा एकवटला

## संतोष देशमुखांच्या मारेकऱ्यांना फाशीची शिक्षा देण्याच्या मागणीसाठी बीडमध्ये निघणार भव्य मोर्चा







- मनोज जरांगे पाटील उपस्थित राहणार
- राज्यभरातील अनेक आमदार सहभागी होणार
- काळ्या फिती लावून सहभाग,घरांवरही काळे झेंडे

बीड, (प्रतिनिधी):- मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील मारेकऱ्यांना अटक करण्यासाठी पोलीस प्रशासनाला चार दिवसांचा अल्टीमेटम देण्यात आला आहे. या प्रकरणात देशमुख आणि त्यांच्या कुटूंबियांना न्याय द्यावा या मागणीसाठी शनिवार दि. २८ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता बीडमधील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापासून पोलीस अधिक्षक कार्यालयावर सर्वपक्षीय मूक मोर्चा काढण्याचा निर्णय काल सोमवारी झालेल्या सर्वपक्षीय बैठकीत घेण्यात आला. दरम्यान या बैठकीत उपस्थित सर्वांनीच पोलीस प्रशासनाने आत्तापर्यंत केलेल्या कारवाईबद्दल नाराजी व्यक्त केली. २४ तासात आरोपींना अटक करू असे म्हणणाऱ्या पोलीस प्रशासनाला १५ दिवस झाले तरी मुख्य आरोपीसह अन्य आरोपींचा पत्ता लागत नाही असा सुर उपस्थित सर्वांच्या बोलण्यातून आला. दरम्यान यासंदर्भात राज्यातील अन्य आमदारांशीही माझे बोलणे झाले असून अनेक आमदार या मोर्चात सहभागी होतील असे आ. संदीप क्षीरसागर यांनी सांगितले. त्याचबरोबर मराठा ▶▶पान २ वर

## धनंजय मुंडेंना बाजूला करून मग चौकशी करावी

### विजय वडेट्टीवार कडाडले



मुंबई, (वृत्तसेवा):- राज्यात गेलं काही दिवसांपासून परभणीतील सोमनाथ सूर्यवंशी मृत्यू प्रकरण, बीडचा मसाजोगमधील सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरण, मराठी कुटुंबाला झालेली मारहाण या मुद्द्यांवरून मोठी खळबळ उडाली आहे. दरम्यान, या सगळ्या प्रकरणावर काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी महायुती ▶▶पान २ वर

## वाल्मिक कराड माफिया

नांदेड, (वृत्तसेवा):-बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणावरुन यंदाचं हिवाळी अधिवेशन चांगलंच गाजलं. या अधिवेशनात मुख्यमंत्र्यांनी सखोल चौकशीचे आदेश दिले असून कुणालाही सोडणार नसल्याचे म्हटले. मात्र, याप्रकरणी सातत्याने वाल्किम कराड यांच्यावर गुन्हा दाखल करुन त्यांना अटक करण्याची मागणी केली जात आहे. दुसरीकडे परभणीमधील सोमनाथ सूर्यवंशी मृत्यूप्रकरणावरुनही संताप व्यक्त होत आहे. त्याच पार्श्वभूमीवर काँग्रेस नेते व लोकसभा विरोधी

### धनंजय मुंडेंचा राजीनामा घ्या- नाना पटोलेंची मागणी



पक्षनेते राहुल गांधी आज परभणीतील पीडित सोमवंशी कुटुंबीयांची भेट घेणार आहेत. त्यासाठी, आज नांदेड विमानतळावर उतरुन ते परभणीला जातील, त्यासाठी विमानतळावर काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्नीतला, प्रदेशाध्यक्ष नाना पटोल, माजी विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवर दाखल झाले आहेत. यावेळी, नांदेड येथून पत्रकारांशी संवाद साधताना नाना पटोले यांनी बीडच्या घटनेवरुन मंत्री धनंजय मुंडेंचा राजीनामा मागिताला आहे. बीडमधील सरपंच संतोष देशमुख हत्याप्रकरणावरुन राज्यातील वातावरण तापलं असून मराठा क्रांती मोर्चाने देखील तीव्र शब्दात संताप व्यक्त केला आहे. तसेच, मंत्री धनंजय मुंडेंची मंत्रिमंडळातून हकालपट्टी करा, अशा मागणीचे निवेदनही बारामतीमधील मराठी क्रांती मोर्चाच्या सदस्याने दिले आहे. आता, काँग्रेस नेते नाना पटोले यांनीही धनंजय मुंडेंच्या राजानाम्याची मागणी केली आहे. अजित पवारांवर ज्यावेळेला आरोप झाले , तेव्हा अजित पवारांना देखील मंत्रिमंडळातून बाहेर काढण्यात आले होते. मुख्यमंत्री आणि अजित पवारांनी धनंजय मुंडे यांना ▶▶पान २ वर

## मंत्री संजय सिरसाट यांनी घेतली पोलीस अधीक्षकांची भेट...



बीड, (प्रतिनिधी):-मयत संतोष देशमुख हत्ये प्रकरणात शिवसेनेचे मंत्री संजय सिरसाट यांनी पोलीस अधीक्षकांची भेट घेतली. यावेळी त्यांनी पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांच्यासोबत अर्धा तास चर्चा केली. पोलीस तपासा संदर्भात आढावा घवून आरोपींना लवकरात लवकर अटक करण्याच्या सूचना केल्या. एसपींच्या भेटी नंतर मसाजोग येथे जावून घेणार देशमुख कुटुंबाची भेट घेतली.

## संतोष देशमुख यांच्या खुनातील प्रत्येक आरोपीला शिक्षा होईल



### उद्योगमंत्री उदय सामंत यांची देशमुख कुटुंबीयांशी भेट

बीड, (प्रतिनिधी): - मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांची अत्यंत निर्घृणपणाने हत्या करण्यात आली, यातील एकही आरोपीला आम्ही सोडणार नाही अशी शासनाची भूमिका आहे हे ▶▶पान २ वर

## न्यायासाठी साथ द्या-वैभवी देशमुख



माझ्या वडिलांची अतिशय निर्दयीपणे हत्या करण्यात आली. अहोरात्र समाजासाठी काम करणार्या माझ्या वडीलांना नराधमांनी अपहरण करून जीवे मारले. हे प्रकरण देशभर गाजले असताना माझ्या वडिलांचे मारेकरी आणि त्यांचा सुत्रधार अजूनही अटकेत नाही, आम्हाला न्याय पाहीजे. राक्षसी प्रवृत्तीच्या या लोकांना कठोरात कठोर शासन झाले पाहिजे. माझ्या वडिलांना न्याय मिळवून ▶▶पान २ वर

## अज्ञातांनी शेतकऱ्याला बेदम मारहाण करून दुचाकी जाळली



पिंपळनेर, (प्रतिनिधी):- पिंपळनेर पोलिस स्टेशनच्या हद्दीत लिंबारुई देवी येथील शेतकरी जगन्नाथ ज्ञानोबा नांदे (वय ५५, रा. लिंबारुई, यांना काठीने बेदम मारहाण केली. त्यानंतर त्यांची मोटार सायकल जाळून टाकली. ही घटना बीड तालुक्यातील लिंबारुई देवी येथे रविवारी रात्रीच्या सुमारास घडली. शेतकरी जगन्नाथ यांनी रात्री ८ वाजण्याच्या सुमारास शेतात पिकांसाठी पाणी दिले. त्यानंतर ते शेतात बाजावर बसले होते. यावेळी अचानक अज्ञात तीन जणांनी काठीन ▶▶पान २ वर

## डॉ.थोरातांचे धारुरात मिशन ऑपरेशन

### तीन तासात छत्तीस शस्त्रक्रिया,अपेंडिक्स प्रथमच,शहरवासियांनी केले स्वागत



बीड, (प्रतिनिधी):-डॉ. अशोक थोरात जिल्ह्यात असावे अशी लोकमागणी असते, याचे कारण काल धारूरकरांनी अनुभवले. स्वतः डॉ. थोरात यांनी तीन तासात छत्तीस शश्त्रक्रिया केल्या, विशेष म्हणजे धारूर या तालुका रुग्णालयात पहिल्यांदा अपेंडिक्सचे ऑपरेशन करण्यात आले. सिजरसह अन्य ऑपरेशन आता धारूरमध्येच कसे होतील याकडे आपण जातीने लक्ष देणार असून महिन्यात दोन वेळा स्वतः येऊन रुग्ण सेवा देणार असल्याचे म्हटले. यावेळी रुग्ण नातेवाईक व स्थानिक पत्रकारांकडून स्वागत करण्यात आले. दिनांक २३-१२-२०२४ रोजी राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम अंतर्गत ग्रामीण रुग्णालय धारूर येथे टंगटाय शत्राक्रिया व कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सदर शिबीर हे मा. जिल्हा शल्य चिकित्स डॉ. अशोक थोरात सर, मा.जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ उल्हास गंडाळ सर, मा. निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ.एल.आर. तांदळे सर, वैद्यकिय अधीक्षक डॉ.सोळंके सर, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. लोमटे सर व श्री. तांगडे आर. के. यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आले. या शिबिरामध्ये मा. जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. थोरात सर ▶▶पान २ वर

## धनंजय मुंडेंना ‘सातपुडा’,पंकजा मुंडेंना ‘पर्णकुटी’

### कुठल्या मंत्र्याला मिळाला कुठला सरकारी बंगला?

मुंबई, (वृत्तसेवा):-महाराष्ट्रात महायुतीचं सरकार निवडलं गेलं त्याला आज बरोबर एक महिना पूर्ण झाला. आजचा दिवसही महत्त्वाचा आहे कारण खातेवाटपानंतर आज सगळ्या मंत्र्यांच्या दालनांचं आणि त्यापाठोपाठ बंगल्यांचं वाटपही समोर आलं आहे. विधानसभा अध्यक्ष, विधान परिषद अध्यक्ष यांच्यासह कॅबिनेट मंत्र्यांपैकी कुणाला कुठला बंगला मिळाला ते समोर आलं आहे. आत्तापर्यंत ३१ जणांची यादी समोर आली आहे. आधी दालनांचं वाटप आता बंगल्यांचंही वाटप : मंत्रिमंडळ खातेवाटपानंतर आता मंत्र्यांना मंत्रालयातील दालनाचे आणि दालनाच्या पाठोपाठ सरकारी बंगल्यांचेही वाटप



करण्यात आलं. त्यामध्ये, विधानपरिषद सभापती राम शिंदे यांना ज्ञानेश्वरी हा बंगला देण्यात आला असून विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांना शिवगिरी बंगल्याची चावी मिळाली आहे. भाजपा प्रदेशाध्यक्ष आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना रामटेक बंगला देण्यात आला आहे.

### कुणाला कुठला बंगला?

राहुल नार्वेकर-शिवगिरी, राम शिंदे- ज्ञानेश्वरी, चंद्रशेखर बावनकुळे- रामटेक, राधाकृष्ण विखे पाटील- रॉयलस्टोन, पंकजा मुंडे- पर्णकुटी, शंभूराज देसाई-मेघदूत, गणेश नाईक-पवनगड, धनंजय मुंडे- सातपुडा, चंद्रकांत पाटील-सिंहगड, गिरीश महाजन- सेवासदन, मंगलप्रभात लोढा-विजयदुर्ग, अशोक उईके- लोहगड, आशिष शेलार-रत्नशिषु, दत्तात्रय भरणे- सिद्धगड, आदिती तटकरे-प्रतापगड, शिवेंद्रराजे भोसले- पन्हाळगड, मणिकराव कोकाटे- अंबार, ▶▶पान २ वर



# प्रकाशाचे सांध्यपर्व!




भारतीय क्रिकेट संघ जेव्हा ऑस्ट्रेलियासारख्या कठीण दौऱ्यावर निघाला, तेव्हा त्यातील चार खेळाडू कारकीर्दीचा संधिकाल सुरू असलेले होते, आहेत. न्यूझीलंडविरुद्ध घरच्या मैदानावर सपाटून मार खाऊन ऑस्ट्रेलियात चाललेल्या या संघाकडून फारशी अपेक्षा नसतानाही या चमूने पहिला सामना जिंकला खरा; पण दुसऱ्या सामन्यातील वाताहत आणि तिसऱ्यात याच मार्गावरून वाटचाल सुरू असताना पाऊस मदतीला आल्याने वाचलेली इभ्रत पाहता, आत्ताचा संघ या दौऱ्यानंतर मोठ्या स्थित्यंतरातून जाणार हे स्पष्ट आहे. त्या स्थित्यंतरातील एक थोडा अनपेक्षित आणि चुटपुट लावून गेलेली 'कलाटणी' म्हणजे फिरकी गोलंदाज रविचंद्रन अश्विनची निवृत्ती. अश्विनचे वय पाहता खरे तर त्याची निवृत्ती अकाली वगैरे नाही. कोणताही चांगला आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटू वयाच्या विशीत आंतरराष्ट्रीय कारकीर्दीला सुरुवात करून तिशीच्या उत्तरार्धात निवृत्त होतो, तसा अश्विनही १४ वर्षे आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळून ३८ व्या वर्षी निवृत्त झाला. निवृत्तीचा निर्णय वैयक्तिक आहे, असे तो सांगत असला, तरी भारतीय क्रिकेटमध्ये जे जे काही होते, ते कधीच वैयक्तिक राहात नाही. अश्विनच्या निर्णयालाही ते लागू होते. सामने जिंकून दिलेल्या क्रिकेटपटूला निवृत्त होताना चांगली मानवंदना मिळायला हवी होती, असे सूर उमटले, ते त्यामुळेच. 'मी त्याला अशा प्रकारे निवृत्त होऊ दिले नसते,' असे कपिलदेव यांनी बोलूनही दाखवले. पण, हा केवळ त्याच्याच निवृत्तीचा मुद्दा नाही, तर भरीव कामगिरी केलेल्या खेळाडूंच्या कारकीर्दीच्या संधिकालाबाबत भारतीय क्रिकेटने अधिक समंजस असण्याची गरज आहे, हा यातील महत्त्वाचा धडा आहे. या धड्याकडे वळण्यापूर्वी अश्विनने जो वस्तुपाठ घालून दिला, त्याबाबत. अश्विन हा काही भारतीय क्रिकेटमधील अतिशय लोकप्रिय खेळाडूंचे जे परिमाण आहे, त्यात बसणारा नाही. नैसर्गिक उंची सोडल्यास व्यक्तिमत्त्वात वेगळा रुबाबदारपणा आहे, असेही नाही. त्याला संघात घेऊनही अंतिम ११ खेळाडूंत खेळवले नाही, म्हणून खूप मोठ्या चर्चा झडल्या किंवा त्यामुळेच कसा सामन्याच्या निकालावर परिणाम झाला, असेही अपवाद वगळता कधी म्हटले गेलेले नाही. तो काही जगातील अत्यंत अभिजात ऑफस्पिनर किंवा त्यांचा किमान वारसा चालवणारा वगैरेही नाही. पण, तरी त्याचे क्रिकेटमध्ये वेगळे स्थान आहे. किंबहुना हे सगळे नाही, तरी त्याच्या कामगिरीची क्रिकेटच्या इतिहासाला दखल घ्यावीच लागेल, हे त्याचे वैशिष्ट्य. एरवी १०६ कसोटी सामन्यांत ५३७ बळी घेणे हे गोलंदाजाकडे कला आणि कौशल्य दोन्ही असल्याशिवाय साध्य होत नाही. अश्विनची खासियत अशी की, त्याने कारकीर्दीच्या प्रत्येक महत्त्वाच्या टप्प्यावर वैयक्तिक आणि सांघिक पातळीवर समस्या निवारकाची भूमिका बजावली आहे. तो अजून पुरता कायमचा फिरकी गोलंदाजही झालेला नसताना भारताच्या १७ वर्षांखालील संघाच्या शिबिरात असताना त्याला पहिली समस्या कोणती भेडसावली असेल, तर भाषेची. त्यावर त्याने इतर कशाहीपेक्षा व्यावहारिक उत्तर शोधले, ते हिंदीची खासगी शिकवणी लावून. समस्या या सोडविण्यासाठी असतात, याची खूणगाठ मनाशी पक्की बांधून तो आपल्या गोलंदाजीबाबतही असेच प्रयोग करत राहिला. 'तू ऑफस्पिनची अभिजातता जप, जास्त प्रयोग करू नकोस,' असा कधी आगंतुक सल्ला किंवा हेटाळणीसुद्धा त्याच्या वाट्याला आलीच नाही, असे नाही. त्याने यावर हटकून स्वतंत्र उपाय शोधले, हा त्याचा धाडसीपणा. समोर खेळणाऱ्या फलंदाजाला आपण टाकत असलेल्या प्रत्येक चेंडूवर नवे प्रश्न विचारायचे, हे त्याचे यावरचे उत्तर! कधी टप्पा बदलून, कधी गोलंदाजीची धाव कमी–जास्त करून, कधी 'बोलिंग क्रीझ'चा अतरंगी वापर करून आणि अनेकदा 'कॅरम बॉल'च्याच विविध क्लृप्त्या अजमावून फलंदाजाला कायम बुचकळ्यात पाडणे हा त्याचा आवडता छंद. प्रयोगाला अश्विन कधी घाबरला नाही आणि त्यासाठी सराव जाळ्यात वाट्टेल तेवढे कष्ट घ्यायला तो कमीही पडला नाही. भारताबाहेरच्या खेळपट्ट्या फिरकीला पोषक नसतानाही त्याने यश मिळवले, ते या जोरावर. अर्थात, तेथे कदाचित आपल्या गोलंदाजीची फारशी करामत चालणार नाही, ही समस्या असू शकते म्हटल्यावर त्याने फलंदाजी मजबूत करण्याचा उपायही शोधलाच. आठव्या क्रमांकावर फलंदाजीला येऊन साडेतीन हजारांहून अधिक धावा, सहा शतके आणि १४ अर्धशतके ठोकणे आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये फार जणांना जमलेले नाही. कसोटी क्रिकेटमध्ये ११ वेळा मालिकावीर किताब मिळवणे हीसुद्धा काही नेहमी घडणारी गोष्ट नाही. घरच्या मैदानावर सलग १३ वर्षे सर्व कसोटी सामने खेळणाऱ्या अश्विनला एकदिवसीय सामन्यांत मात्र अन्यायकारक पद्धतीने सातत्याने आत–बाहेर ठेवण्यात आले. त्याच्यासारख्या गोलंदाजाशी किमान याबाबत चांगला संवाद तरी साधायला हवा होता. पण अडचणीचे उपायांत रूपांतर करणाऱ्या अश्विनने टी–२० प्रकारात प्रयोगशील गुणवत्तेवर आपली उपयुक्तता सिद्ध केली आणि तेथे आपली दखल घ्यायला भाग पाडले. अशा चढ–उतारांच्या प्रवासात त्याची निवृत्ती हे त्यातील जरा अनपेक्षित वळण. अनेक भले भले क्रिकेटतज्ज्ञ या आकस्मिकतेचे विश्लेषण करत असले, तरी अश्विन स्वत: मात्र या गुंत्यातून पाय मोकळे करून बसला आहे. त्याला ही समस्याच वाटत नसावी. पण त्याला काही वाटत नसले किंवा तो तसे दाखवत असला तरी भारतीय क्रिकेट चालविणाऱ्यांनी त्याच्या निवृत्तीच्या निमित्ताकडे समस्या नाही, तरी किमान उत्तरदायित्व म्हणून पाहणे गरजेचे. क्रिकेटच्या एखाद्या पिढीवर आपली छाप सोडणाऱ्या क्रिकेटपटूंना निवृत्तीचा निरोपही संस्मरणीय मिळावा, ही काही वावगी अपेक्षा नाही. तसा तो सचिन तेंडुलकर, सौरभ गांगुली, अनिल कुंबळे आदी गेल्या पिढीतील क्रिकेटपटूंना मिळालाही. त्यानंतरच्या काळात भारतीय क्रिकेटची धुरा ज्यांनी खांद्यावर वाहिली, त्यांपैकी अश्विन होता. अश्विनची निवृत्तीची वेळ चुकली असे झालेले नाही, कारण त्यानेच म्हटल्याप्रमाणे गेली दोन वर्षे झोपताना त्याला त्याने टिपलेले बळी, काढलेल्या धावा अशा कोणत्याच आठवणी डोळ्यांसमोर येत नव्हत्या. असे होते आहे, म्हणजे थांबण्याची वेळ झाली आहे, याची जाणीव होणे आणि ती झाल्यावर जाणतेपणाने निर्णय घेणे हे अश्विनचे वैशिष्ट्यच. अर्थात, हे सांगताना त्याने आपल्यातील क्रिकेट संपलेले नसल्याने क्लब क्रिकेट खेळत राहू, हेही सांगितले आहे आणि इथेच जरा अडखळायला झाले आहे. अश्विनच्या आधी, अशी दौरा चालू असताना एकदम तडकाफडकी निवृत्तीची घोषणा जाहीर करणारे अलीकडचे ठळक उदाहरण महेंद्रसिंह धोनीचे. बरोबर दहा वर्षांपूर्वी त्यानेही अशीच ऑस्ट्रेलिया दौऱ्यातील चार कसोटी सामन्यांच्या मालिकेतील तिसऱ्या सामन्यानंतर अचानक निवृत्ती घेऊन अचंब्यात टाकले होते. धोनी काय किंवा अश्विन काय, त्यांच्या निवृत्तीचे निमित्त भारतीय क्रिकेटमधील एक कटू वास्तव दर्शविण्यास पुरेसे आहे. ते हे, की महान खेळाडूंना त्यांच्या कारकीर्दीच्या उतारावर टाकाऊ वस्तू म्हणून बघणे. सांघिक खेळात एखाद्यालाच नायक बनवून डोक्यावर बसवणे जसे चूक, तसे उत्तम खेळाडूला किमान आदरपूर्वक निरोप मिळण्याची संधी नाकारणेही अयोग्यच. भारतीय क्रिकेट चालविणाऱ्यांनी, कितीही कठोर वाटला, तरी कारकीर्दीचा संधिकाल सुरू झालेल्या खेळाडूंशी निवृत्तीच्या योजनेबाबतचा संवाद साधणे, नियोजन करणे गरजेचे आहे. सध्याच्या संघातील रोहित शर्मा, विराट कोहली, रवींद्र जडेजा यांच्यावर हा निर्णय घेण्याची वेळ येईल, तेव्हा ते अनपेक्षित असण्यापेक्षा नियोजित असलेले बरे. तरीही निवृत्तीचे दु:ख खेळाडूला असणारच; पण त्याला उगाच औचित्यभंगाच्या वेदनेची किनार नसावी. संधिकालाला तिमिराचा उदय म्हणण्यापेक्षा प्रकाशाचे सांध्यपर्व म्हणणे अधिक उचित.

# संतोष देशमुख हत्याकांडातील तीन आरोपींच्या पोलीस कोठडीत वाढ

केज, (प्रतिनिधी): – राज्यासह देशात गाजत असलेल्या बीड जिल्ह्यातील मस्साजोग ता. केजचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याकांडातील तीन आरोपींना आज न्यायालयाने सहा जानेवारी पर्यंत पोलीस कोठडीत वाढ करण्यात आहे आहे. बीड जिल्ह्यातील मस्साजोग ता. केज येथील सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण करून हत्या करण्यात आलेल्या प्रकरणातील आरोपी जयराम चाटे, महेश केदार आणि प्रतिक घुले या तीन



आरोपींची पोलीस कोठडी दि. २३ डिसेंबर रोजी संपत होती. आज दि. २३ डिसेंबर रोजी पोलीस बंदोबस्तात या तीनही आरोपींना केज न्यायालया समोर हजर केले असता न्यायालयाने पुन्हा त्यांच्या पोलीस कोठडीत वाढ करीत ६ जानेवारी २०२५ पर्यंत पोलीस कोठडीत वाढ केली आहे. दरम्यान चौथा आरोपी विष्णू चाटे यांची २७ डिसेंबर पर्यंत पोलीस कोठडी आहे. तसेच याच गुन्ह्यात आणखी तीन आरोपी फरार आहेत.

# नगरपरिषद समोर दिव्यांगांचे उपोषण सुरू




बीड, (प्रतिनिधी):– ५ टक्के दिव्यांग निधी वाटप करण्याच्या मागणीसाठी आज सोमवार (दि. २३) सकाळपासून दिव्यांगांनी उपोषणाला सुरुवात केली आहे. यामुळे नगरपरिषद निधी वाटप करणार का ? याकडे लक्ष लागले आहे. सध्या नगरपरिषद काही ना काही कारणाने नेहमीच चर्चेत असून, आता दिव्यांगांनी आंदोलन सुरू केले आहे. बीड नगरपरिषदेने मागील २०२३ वर्षातील ५ टक्के दिव्यांग निधीचे वाटप केले नाही. यामुळे शहरातील ५०० दिव्यांग या लाभापासून वंचित आहेत. यासाठी अनेकवेळा मागणी करुनही नगरपरिषद प्रशासनाने दुर्लक्ष केले. यामुळे संतप्त दिव्यांगांनी दि.१८ रोजी निवेदन देऊन सोमवार (दि.२३) पासून उपोषण करण्याचा इशारा दिला होता. या इशाऱ्यानंतर निधी वाटप न केल्याने आजपासून दिव्यांगांनी आंदोलन सुरू केले आहे. दिव्यांग अलीम पठाण, पठाण शेरखान सत्तार, मोमीन नसरीन सह आदी दिव्यांग बांधव या आंदोलनात सहभागी झाले आहेत. या आंदोलनानंतर तरी नगरपरिषद या दिव्यांगांचा निधी वाटप करणार का? याकडे लक्ष लागले आहे.

# पुरुष जातीचे जिवंत अर्भक आढळले



केज, (प्रतिनिधी):– तालुक्यातील होळ ते आडस दरम्यान जाणाऱ्या रस्त्याच्या कडेला एका उसाच्या शेतात तीन महिन्याचे पुरुष जातीचे जिवंत अर्भक आढळून आले आहे. आज (दि.२३) सोमवार रोजी सकाळी सातच्या सुमारास शेतात जाणाऱ्या एका शेतकऱ्याला उसाच्या शेतात काळ्या व लाल चौकटी रंगाच्या कपड्यात पांघरून घातलेले एक तीन महिन्याचे पुरुष जातीचे जिवंत अर्भक आढळून आले. शेतकऱ्याने ही माहिती युसुफवडगाव पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक मच्छिंद्रनाथ शेंडगे यांना दिली. माहिती मिळताच पोलीस निरीक्षक मच्छिंद्रनाथ शेंडगे यांनी पोलीस उपनिरीक्षक राहुल पतंगे आणि श्री. खेडकर व महिला पोलिस गाडेकर यांना घटनास्थळी रवाना केले. पोलिसांनी सदर अर्भक ताब्यात घेवून त्याला स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालय येथे साठी दाखल केले आहे.

# वाल्मिकी कराडवर एकट्या परळीत २३ गुन्हे

## मुख्यमंत्र्यांकडे गुन्ह्यांची यादीच देणार–अंजली दमानिया

मुंबई, (वृत्तसेवा):–बीड जिल्ह्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांची निर्घृण हत्या करण्यात आली. हे संपूर्ण प्रकरण राज्यभरात तर गाजलचं पण हिवाळी अधिवेशनातही त्याचे पडसाद उमटले. राष्ट्रादी काँग्रेसचे सर्वेसर्वा शरद पवार , तसेच उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही देशमुख कुटुंबियांची भेट घेत न्याय मिळवून देण्याच वचन दिले. संतोष देशमुख हत्या प्रकरणात धनंजय मुंडे यांचे निकटवर्तीय मानले जाणारे वाल्मिक कराड यांचे नाव वारंवार समोर येत असून ते मुख्य आरोपी आहेत. वाल्मिक करडावरून विरोधक सातत्याने सरकारला धारेवर धरत असून धनंजय मुंडे यांच्याविरोधातही भूमिका घेताना दिसत आहे. हे प्रकरण तापलेलं असतानाच आता सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनीही याप्रकरणावरून आक्रमक भूमिका घेतली आहे. त्यांनी या मुद्यावरून ट्विटही केले असून एका वृत्तवाहिनीला बोलतानाही त्यांनी या विषयावर मौन सोडलं. ' वाल्मिक कराड यांच्यावर फक्त परळीत २३ गुन्हे आहेत. त्याचे सेक्शन्स पाहिले तुम्ही तर एकेक सेक्शन त्यांच्यावर ४–५ वेळा लागले आहेत. म्हणजे इतका माहीर गुन्हेगार आहे. आणि आजपर्यंत ते फरार आहेत की त्यांना फरार केलं गेलंय? हा सगळ्यात महत्वाचा आणु मूळ प्रश्न आहे, असे अंजली दमानिया म्हणाल्या. याच्या विरुद्ध कुठल्याही परिस्थितीत जनतेने लढा दिलाच पाहिजे, असेही त्यांनी नमूद केलं.



### शिक्षा होत नाहीये हे महाराष्ट्राचं दुर्दैव

आता माझ्याकडे जी लिस्ट आहे ती मी तुम्हाला देते, त्याच्यातले गुन्ह्यांची गंभीरता तुम्ही पहा. त्यांच्याकडे रिव्हॉल्व्हर लायसन्स नसताना आर्म्स ॲक्टखाली ( ३/२४ आणि ४/२५ ) सीरियस गुन्हे दाखल आहेत. तरीही तो माणूस अगदी आरामात फिरतो. आणि त्याला काहीच शिक्षा होत नाहीये, हे महाराष्ट्राचं दुर्दैव आहे, अशी खंत दमानिया यांनी व्यक्त केली. त्यांनी आज बीडमध्ये जी दहशत निर्माण केली आहे, ते काय काय करतात हे बीडच्या कुठल्याही सामान्य माणसाला विचारलं ना तर ते सांगतली. खंडणी वगैरे त्यातले फार चिल्लर गोष्टी आहेत, त्याच्यापेक्षा अतिशय गंभीर गुन्हे हे सर्रास करतात, असा आरोप दमानिया यांनी लावला आहे.

पान १ वरून

### बीडमध्ये शनिवारी...

योध्दा मनोज जरांगे पाटील हे देखील उपस्थित राहतील असे बी.बी. जाधव यांनी सांगितले. बीड येथील आशिर्वाद लॉन्स येथे आज सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात न्याय मिळावा या मागणीसाठी आयोजीत मोर्चाच्या पुर्व तयारीसाठी सर्व पक्षीय बैठक घेण्यात आली. या बैठकीला आ. संदीप क्षीरसागर, माजी आ. सय्यद सलीम, माजी आ. उषाताई दराडे, मोहन जगताप, माजी आ. पृथ्वीराज साठे, ॲड. शेख शफीकभाऊ, परमेश्वर सातपुते, राजेंद्र मस्के, सीए बी.बी जाधव, गंगाधर काळकुटे, अशोक येडे, प्रा. हनुमंत भोसले, कुंदाताई काळे, राजेसाहेब देशमुख, गोपाळ धांडे, गणेश ढवळे, खुर्शीद आलम यांच्यासह सर्वपक्षीय पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते. विशेष म्हणजे यावेळी मयत संतोष देशमुख यांची मुलगी वैभवी आणि बहिण देखील उपस्थित होत्या. सर्वप्रथम उपस्थितांनी संतोष देशमुख यांना श्रध्दांजली अर्पन केली. यावेळी भावना व्यक्त करतांना वैभवी हिला अश्रु अनावर झाले होते. या प्रसंगी आ. संदीप भैय्या क्षीरसागर, ॲड. शेख शफीकभाऊ यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

### वाल्मिक कराड माफिया...

मंत्रिमंडळातून काढून चौकशी झाली तरच संतोष देशमुख यांना न्याय मिळेल, असे पटोले यांनी म्हटलं आहे. वाल्मिकी कराड हा माफीया आहे. मस्साजोग प्रकरणात सत्ताधारी पक्षातील आमदारांनी देखील सत्य परिस्थिती सांगितली होती. पण, मुख्यमंत्र्यांनी टाइमपास केला, माफियाला ताकद देण्याचं काम केलं. धनंजय मुंडे यांना मंत्रिमंडळातून बाहेर काढावं आणि या प्रकरणाची चौकशी करावी, अशी आमची मागणी असल्याचं नाना पटोले यांनी नांदेडमधून म्हटलं.

### धनंजय मुंडेंना बाजूला...

सरकारवर निशाणा साधलाय. सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात मंत्र्यांशी संबंध आहे, त्यामुळे मंत्रीपद असेल तर निष्पक्ष चौकशी होणार नाही, धनंजय

पान १ वरून

मुंडे यांना बाजूला करावे आणि मग चौकशी करावी जो सहकारी आहे त्यांच्या कंपन्यांमध्ये भागीदारी आहे अशा व्यक्तीची चौकशी कशी होणार असा सवाल वडेट्टीवारांनी केलाय. दरम्यान परभणीच्या सोमनाथ सूर्यवंशी यांच्या शवविच्छेदनाचा अहवालावरूनही त्यांनी महायुतीला कडाडून टीका केल्याचा दिसलं. लोकांचा जीव जाईपर्यंत मारहाण केली. कितीही म्हणू दे कोंबिंग ऑपरेशन झाले नाही पण ते झाले. काही झालं नाही असं सांगत असले तरी शवविच्छेदनाचा अहवाल समोर आहे. हे सगळे या राज्यात जी नीती आहे दलित आदिवासी कुठेच नसतो. कुणी आवाज केलं तर मारू आणि काही झालं तर पाच दहा लाख देऊ ही सरकारची मानसिकता विकृत आहे. त्यामुळे राहुलजी भेटून सरकारबाबत पोलीस मारहाणी वरून योग्य भूमिका ठरवतील असेही वडेट्टीवार म्हणाले.

सगळ्यांच्या नौटंकीवर आम्ही पण बोलू

सत्तेची गुर्मी आहे. दलित कुटुंबातील व्यक्तीचा मृत्यू होतो. संविधान शिल्प तोडले जाते. ही प्रकरणं कशी हाताळली जात आहेत याकडे महाराष्ट्र बघत आहे. बावनकुळे यांना सल्ला आहे बोलताना शब्द जपून वापरावे. सगळ्यांच्या नौटंकीवर आम्ही पण बोलू असं म्हणत वडेट्टीवारांनी महायुतीला चांगलंच सुनावल्याच दिसतय. मराठी माणूस महाराष्ट्राच्या पद्धतीने हल्ले होतात अपमान होतो त्यांच्या जीवांशी मारण्याचे प्रकार होत आहेत. याचे कारण मराठी माणसाचे सरकार नाही. परप्रांतीय विश्वास दुणावला आहे. उद्या त्यांना शहरात वॉर्डातील मराठी माणूस नको वाटेल. सरकारला वाटते परप्रांतीयांमुळे सरकार आले आहे मराठी लोकांना हद्दपार करणार असं म्हणत वडेट्टीवारांनी महायुतीवर निशाणा साधला.

### न्यायासाठी साथ द्या...

देण्यासाठी किंबहुना माझ्यावर आलेली परिस्थिती आणखी कोणत्याच मुलीवर येऊ नये यासाठी साथ द्या अशी भावनिक साद या बैठकीदरम्यान स्व.संतोष देशमुख यांची मुलगी कु.वैभवीने घातली. वैभवीला ऐकताना उपस्थित

पान १ वरून

प्रत्येकजण यावेळी हळहळला.

### संतोष देशमुख यांच्या...

सांगण्यासाठी व देशमुख कुटुंबीयांना शासन त्यांच्यासोबत खंबीरपणे आहे ही हमी देण्यासाठी उपमुख्यमंत्री श्री एकनाथ शिंदे यांचा संदेश आपणास देत आहोत. शासन सर्वप्रथम तुमच्या सोबत आहे असे राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी आज देशमुख कुटुंबीयांचा सांत्वनाप्रसंगी सांगितले. उद्योग मंत्री यांच्यासोबतच राज्याचे सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट तसेच राज्यमंत्री मेघना साकोरे– बोर्डीकर यांनी आज या परिवाराच्या सांत्वनासाठी भेट दिली. यावेळी त्यांनी गावकऱ्यांसोबत देखील चर्चा करून त्यांची म्हणणे ऐकून घेतले. या प्रकरणात असणारे मुख्य आरोपी तसेच त्यामागील सूत्रधार यांना आठवड्याभरात अटक करून कारवाई करण्यात येईल असे याप्रसंगी सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांनी गावकऱ्यांशी बोलताना सांगितले. श्री. शिरसाट यांनी आज येथे भेट देण्यापूर्वी बीड येथे पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांची भेट घेऊन याप्रकरणी होत असलेल्या तपासाची माहिती घेतली. यावेळी देशमुख कुटुंबीयांनी चर्चा केल्यानंतर मंत्री उदय सामंत यांनी पत्रकारांशी संवाद साधला. या प्रकरणी एसआयटी गठीत करण्यात आलेली असून न्यायालयीन चौकशी देखील करण्यात येत आहे, त्यामुळे या प्रकरणात लवकरात लवकर दोषीना शिक्षा व्हावी तसेच देशमुख कुटुंबीयांना न्याय मिळावा यासाठी मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे यांनी आदेश दिले आहेत असेही ते म्हणाले. पंधरा वर्षे सार्वजनिक जीवनात राहून स्वतःचे साधे घरही न बांधणारे दिवंगत सरपंच देशमुख यांची गावाच्या विकासाची तळमळ त्यांच्या कामातून लक्षात येते व या पुढील काळातही त्याच प्रकारचा विकास या गावात होईल याची खबरदारी शासन घेईल असे सामंत यांनी ग्रामस्थांशी चर्चा करताना सांगितले. याबाबत सातत्याने मागणी करणाऱ्या राज्यातील सरपंच संघटनेच्या निवेदनाची दखल शासनाने घेतली आहे असेही उदय सामंत यावेळी म्हणाले. देशमुख यांच्या कुटुंबीयांना शिवसेनेतर्फे मदत देण्यात येईल असे सांगून सामंत यांनी देशमुख यांच्या

पान १ वरून

मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी देखील आम्ही घेत आहोत असे यावेळी सांगितले. जी घटना घडली ही अतिशय निंदनीय आहे याबाबत मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस यांनी पूर्ण तपासाचे निर्देश दिले आहेत त्यामुळे येणाऱ्या काळात देशमुख कुटुंबीयांना न्याय मिळवून देण्यास शासन कटीबद्ध आहे असे राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांनी यावेळी भेटीदरम्यान सांगितले.

### अज्ञातांनी शेतकऱ्याला...

बेदम मारहाण करून त्यांच्यावर प्राणघातक हल्ला चढवला. यात ते बेशुद्ध झाले. रस्त्यावर लावलेली मोटार सायकल (चक १३इथ३२९३) जाळून टाकली. याबाबतची फिर्याद शेतकरी नांदे यांचे बंधू भास्कर नांदे यांनी दिली आहे. या घटनेमुळे शेतकऱ्यांत भीतीचे वातावरण पसरले आहे. मारहाण करणाऱ्यांचा तत्काळ शोध घेऊन त्यांना अटक करण्यात यावी, अशी मागणी ग्रामस्थांतून होत आहे. पिंपळनेर पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा केला आहे.

### डॉ.थोरातांचे धारूरात...

यांनी एकूण १७ बालकांवर व १८ (कुटुंब नियोजन ) व १ अपेंडेक्स आशा एकून ३६ शस्त्रक्रिया यशस्वी केल्या. या कॅम्पसाठी ग्रामीण रूग्णालय धारूर येथील वैधकीय अधीक्षक सर्व वैदकीय अधिकारी व सर्व कर्मचारी आरबीएसकेचे वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी तसेच आयुष वैद्यकीय अधिकारी यांचे अमूल्य सहकार्य लाभले.

### कुणाला कुठला...

जयकुमार गोरे–प्रचितीगड, नरहरी झिरवाळ–सुरुची, संजय सावकारे–अंबर ३२, संजय शिरसाठ–अंबर ३८, प्रताप सरनाईक–अर्वतो ५, भरत गोगावले–सुरुची २, मकरंद पाटील–सुरुची ३, गुलाबराव पाटील–जेतवन.... या मंत्र्यांना बंगल्यांच्या चाव्या मिळाल्या आहेत. तसंच आज दालनांचंही वाटप झालं आहे. या दालनांचं वाटप कसं आहे तेही आपण जाणून घेऊ.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed, Beed -431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq-Beed Dist-Beed pin -431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि.बीड, –४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता.जि.बीड –४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com,Eportal-https://marathwadapatra.com

# महापुरुषांचा आदर्श डोळ्यासमोर ठेऊन शिक्षकांनी विचारप्रवर्तक बोलले पाहिजेः प्रा.डॉ. प्रल्हाद लुलेकर

## नालंदा फाउंडेशनच्या बीडच्या वतीने शिक्षकांची राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

वक्तृत्व हे आपलं म्हणणं काय आहे हे स्पष्ट मांडता आलं पाहिजे, समूहाचं म्हणणं मांडता आलं पाहिजे. बाबासाहेब म्हणाले होते की, शंभर चौथी पास पेक्षा एक ग्रॅज्युएट मला पाहिजे जो समाजाचं म्हणणं मांडेल. आता सगळेच ग्रॅज्युएट झालेत पण त्यांना समाजाचं म्हणणं मांडता येत नाही हे दुर्दैव आहे. तुमचं म्हणणं नीटपणे मांडता येण, तशी भाषा कमावणं याला फार महत्व आहे, म्हणून विचारप्रवर्तक तुम्ही किती बोलता आणि तुमच्या विचाराची स्पष्टता किती आहे याला महत्व असल्याचे प्रतिपादन प्रसिद्ध विचारवंत प्रा.डॉ. प्रल्हाद लुलेकर यांनी केले.




तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन, बीड येथे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या (७ नोव्हेंबर) शाळा प्रवेश दिनानिमित्त नालंदा फाउंडेशन बीडच्या वतीने आयोजित शिक्षकांची राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा २०२४ उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नालंदा फाउंडेशन चे अध्यक्ष प्रा.प्रदीप रोडे उपस्थित होते तर विचार मंचावरती प्रसिद्ध विचारवंत प्रा.डॉ. प्रल्हाद लुलेकर, प्रोफेसर.डॉ. सुधाकर शेंडगे, प्रा.डॉ.यशपाल खेडकर, प्राचार्य डॉ.शामसुंदर वाघमारे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

प्रथम पारितोषिक पाटील प्रेमनाथ शामा (बाळाराम परशुराम पाटील कनिष्ठ महाविद्यालय, रोहिंजन, ता. पनवेल, जि. रायगड.) यांना रोख रक्कम रूपये २५०००/- स्मुर्तिचिन्ह, सन्मानपत्र व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले, द्वितीय पारितोषिक मस्के तुकाराम नारायण ( विवेक वर्धनी महाविद्यालय, पंढरपूर.) यांना रोख रूपये १५०००/- स्मुर्तिचिन्ह, सन्मानपत्र व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले, तृतीय पारितोषिक जाधव श्रीराम बापूराव ( कृषी पंडित भागुजीराव ढेकळे महाविद्यालय, पाडळशिंगी, ता. गेवराई जि. बीड.) यांना रोख रक्कम रूपये १००००/- स्मुर्तिचिन्ह, सन्मानपत्र व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले तर उत्तेजनार्थ पारितोषिक पांचाळ शीतल कृष्णा ( डॉ. देसारडा पब्लिक स्कूल, छत्रपती संभाजीनगर.) यांना रोख रक्कम रुपये ५०००/- सन्मानपत्र , पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. स्पर्धेसाठी महाराष्ट्रातील सांगली, सातारा, पुणे, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, मुखेड, नांदेड, कोल्हापूर, पंढरपूर, सोलापूर, लातूर, बीड, जालना, धाराशिव, परभणी, भंडारा, धुळे,जळगाव, रायगड आदी जिल्ह्यांतून अनेक विद्यार्थी स्पर्धक म्हणून सहभागी झाले होते. परीक्षक म्हणून प्रोफेसर डॉ. सुधाकर शेंडगे (हिंदी विभाग प्रमुख, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छ.संभाजीनगर.), प्रा.डॉ.यशपाल खेडकर (विभाग प्रमुख, स्वेरीज कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पंढरपूर,) व प्राचार्य, डॉ.शामसुंदर वाघमारे (शारदा महाविद्यालय, परभणी.) यांनी स्पर्धेचे परीक्षण केले.

याप्रसंगी कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमाचे सहसंयोजक, प्रा. राम गायकवाड यांनी केले तर सूत्रसंचालन प्रा. अंकुश कोरडे यांनी केले. यावेळी कार्यक्रमास सहसंयोजक, प्रा.शरद वंजारे, प्रा.अर्जुन राठोड, इंजिनीयर दिपांकर रोडे, प्राचार्य अशोक धुलधुले, उपप्राचार्य डी.जी. निकाळजे यांचेसह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, शिक्षक स्पर्धक, रसिक श्रोतेंसह आदी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेबाबत बबन पांचाळ, संजय सरडे, फारुकी नुमान, विशाल रोडे, रोहित जोगदंड, सोमनाथ लोंढे, बन्सी ससाने, विजय नागरगोजे सह आदी कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

---

## जाहीर प्रगटन

**मा. श्रीमती एस. एन. निकम, दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, पाटोदा, ता. पाटोदा, जि. बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज ३१९/२०२४**

**नवनाथ व इतर विरुध्द निरंक**

**मार्फत :- अॅड. डी. एम. रोटे**

अर्जदार :-१. नवनाथ पि. किसन बांगर, वय ७५ वर्षे, धंदा शेती, २. रघुनाथ पि. किसन बांगर, वय ७९ वर्षे, धंदा शेती, ३. भगवान पि. किसन बांगर, वय ८३ वर्षे, धंदा शेती, तिघे रा. वाघीरा, ता. पाटोदा, जि. बीड. ४. सिंधुबाई भ्र. रावसाहेब चौरे, वय ७६ वर्षे, धंदा घरकाम, ५. गंगुबाई भ्र. भगवान चौरे, वय ७४ वर्षे, धंदा घरकाम, दोघी रा. जिवाचीवाडी, ता. केज, जि. बीड. ६. इंद्रायणी भ्र. रावसाहेब मुंडे, वय ५० वर्षे, धंदा घरकाम, रा. गोविंदवाडी, ता. माजलगांव, जि. बीड. ७. चंद्रभागा भ्र. गोपिनाथ चौरे, वय ७७ वर्षे, धंदा घरकाम, रा. जिवाचीवाडी, ता. केज, जि. बीड.

विरूध्द निरंक

**मागणी अर्ज :- बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत**

.वरील अर्जदार क्र. १ ते ७ यांनी या न्यायालयात मयत कलावती भ्र. किसन बांगर यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी कलावती भ्र. किसन बांगर यांचा मृत्यु दिनांक ३१/०१/२०१३ रोजी वाघीरा, ता. पाटोदा, जि. बीड येथे झाला असुन अर्जदार क्र. १ ते ३ हे मयताचे मुले असुन अर्जदार क. ४ ते ७ हया मयताच्या विवाहीत मुली आहेत.

वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत अथवा त्यांच्या व्यतिरीक्त इतर कोणी मयताचे वारस आहेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर या जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत कलावती भ्र. किसन बांगर यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. आज दिनांक ०८ माहे ऑक्टोबर २०२४ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. **सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. ०७ नोव्हेंबर २०२४.**

**आदेशावरून.**

शिक्का

(स्वाक्षरीत) क.लिपीक

(स्वाक्षरीत) अधीक्षक दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड

---

## जाहीर प्रगटन

**श्री. व्ही.सी. जोशी १ ले दिवाणी न्यायाधीश क.स्तर बीड ता.जि.बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज नंबर १६३/२०२४.**

**अॅड. वाय. आर. शेळके यांच्या मार्फत**

**संगिता पांडुरंग आबुज वि. निरंक**

ज्यापेक्षा **पांडुरंग पि.आत्माराम आबुज** हे दिनांक ०९/०३/२०२२ रोजी रंजेगाव ता.जि. बीड येथे मयत झालेले आहेत. आणि तसेच अर्जदार

१. संगिता भ्र. पांडुरंग आबुज, वय-५० वर्षे, धंदा घरकाम रा.रंजेगाव, ता.जि.बीड, २. माऊली पि.पांडुरंग आबुज, वय-१६ वर्षे, धंदा : शिक्षण रा. सदर. अ.पा.क. आई अर्जदार क्र. १, ३. आदिनाथ पि.पांडुरंग आबुज, वय : ८ वर्ष, धंदा : शिक्षण, रा.सदर. अ.पा.क. आई अर्जदार कं १, ४. भाग्यश्री पि. पांडुरंग आबुज वय : २० वर्ष, धंदा : घरकाम, रा. सदर, ५. अश्विनी भ्र. अनंता चव्हाण वय : २२ वर्ष, धंदा : घरकाम रा.नाथापुर ता.जि.बीड

अर्जदार क्र १ ही मयत **पांडुरंग पि.आत्माराम आबुज** यांची पत्नी आहे. अर्जदार क्रं २ व ३ हे मयताचे मुले आहेत. तसेच अर्जदार कं. ४ ही मुलगी असुन अर्जदार कं ५ ही मयताची विवाहीत मुलगी आहे. या अर्जदारा व्यतीरिक्त मयतास इतर दुसरे कोणीही वारस नाहीत. असे वरील अर्जदारांचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट, सदरहू अर्जदारांच्या हक्काबददल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना/ अर्जदारांना सदरहू मयत **पांडुरंग पि. आत्माराम आबुज** यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी. प्रकरणाची पुढील तारीख १०/०४/२०२४ आहे. **आज दिनांक ०६ मार्च २०२४ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्कानिशी दिले**

**आदेशावरून.**

शिक्का

(स्वाक्षरीत) क.लिपीक

(स्वाक्षरीत) अधीक्षक दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड

---

## वॉरियर्स फेंसिन्ग क्लब ला विजेतेपद, रायगड फेन्सर ला उपविजेतेपद तर शिवनेरी फेन्सर तिसऱ्या स्थानी

**छ.संभाजीनगर । प्रतिनिधी**

मा, मुख्यमंत्री.वसंतराव नाईक यांच्या सत्ता ग्रहण सप्ताह निमित्त छत्रपती संभाजीनगर जिल्हा तलवारबाजी संघटना वॉरियर्स फेंसिन्ग क्लब व वसंतराव नाईक महाविद्यालय यांच्या संयुक्त विधमाने आयोजित सातव्या वारियर फेंसिंग लीग चॅम्पियनशिप च्या बक्षीस वितरणा प्रसंगी अप्पर पोलीस



अधीक्षक सुनील लांजेवार, श्रीमती योगिता होके,डॉ उदय डोंगरे,सुमेध तारोडकर, गोकुळ तांदळे,डॉ दिनेश वंजारे, राकेश खैरनार, छाया पानसे तसेच संघ मालक स्वप्नील शेळके, महेश तवार, आकाश आरमाळ, कोमल शिंदे, पुष्पा वाघ प्रशांत शहा आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा सागर मगरे यांनी केले यांनी केला. या स्पर्धेमध्ये शहरातील १२४ खेळाडूंनी सहभाग नोंदवला. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी डॉ दिनेश वंजारे, प्रा सागर मगरे, स्वप्नील तांगडे, अजय त्रिभवन, तुषार आहेर राहुल दनके, जयदीप पांढरे, विश्वजीत कुलकर्णी, निखिल बाविस्कर, अनिल देवकर, गौरव गोटे, अमृता भाटी यांनी परिश्रम घेतले.

---

दैनिक मराठवाडा पत्र, दिनांक २४/१२/२०२४

### नावात बदल

मी असे जाहीर करते की, माझ्या नावामध्ये चुकून
जुने नाव **सबीता हालदार**
असे झाले आहे. नवीन नाव **सविता समीर हालदार**
पत्ता- मोंढा रोड चौसाळा, तालुका- जिल्हा बीड ४३११२६.
मो.नंबर - 8329199689

---

दैनिक मराठवाडा पत्र, दिनांक २४/१२/२०२४

### नावात बदल

मी असे जाहीर करतो की, माझ्या नावामध्ये चुकून
जुने नाव **शुभ समीर हालदार**
असे झाले आहे. नवीन नाव **शुभम समीर हालदार**
पत्ता- मोंढा रोड चौसाळा, तालुका- जिल्हा बीड ४३११२६.
मो.नंबर - 8329199689

---

Daily Marathwada Patra, Dt. 24/12/2024

### Change in Name

I DECLARE BY THIS PUBLICATION
ABOUT CHANGE IN MY NAME
OLD NAME-**SABITA SAMIR HALDAR**
CHANGE IN TO MY NEW NAME-
**SAVITA SAMIR HALDAR**
-Address-
MONDA ROAD CHOUSALA, Tq. &
Dist BEED- 431126. MO - 8329199689

---

Daily Marathwada Patra, Dt. 24/12/2024

### Change in Name

I DECLARE BY THIS PUBLICATION
ABOUT CHANGE IN MY NAME
OLD NAME- **SUBHA HALDAR**
CHANGE IN TO MY NEW NAME-
**SHUBHAM SAMIR HALDAR**
-Address-
MONDA ROAD CHOUSALA, Tq. &
Dist BEED- 431126. MO - 8329199689

---

## जाहीरनामा

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे कार्यालय वडवणी जि.बीड**

**जा.क्र.२०२४/दंड विभाग / जन्म नोंद/सं. नो.- १५९,**

**जन्म-मृत्यु नोंदणी प्रमाणपत्र मिळणेबाबत**

**जन्म-मृत्यु नोदणी (सुधारणा) कायदा २०२३ मधील कलम ११ अन्वये**

सर्व जनतेस याद्वारे जाहीर केले जाते की, अर्जदार **नामे हनुमंत मनोहर राकुसले, रा. खंडोबाची वाडी तहत खडकी, ता. वडवणी, जि. बीड** यांनी त्यांची मुलगी नामे स्वाती हनुमंत राकुसले यांचा जन्म दिनांक ०२/०५/२००७ रोजी खंडोबाची वाडी, ता. वडवणी, जि. बीड येथे राहत्या घरी झाला असुन अर्जदार यांनी सदर जन्माची नोंद ग्रामपंचायत खडकी, ता. वडवणी, बीड यांचे नोंदवहीमध्ये घेऊन प्रमाणपत्र मिळावे म्हणुन या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

करिता उक्त नमुद व्यक्तीची जन्मतारीख व जन्मठिकाण कायदेशीर नाही, असे कोणास या कार्यालयाचे निदर्शनास आणून द्यावयाचे असेल तर या जाहिरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत त्याने / तिने या कार्यालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात. तसेच सर्व जनतेस हेही कळविण्यात येते की, जर विहीत मुदतीत कोणी योग्य हरकती दाखल न केल्यास सदर कार्यालय अर्जदार यांच्या हक्काबदल पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत झाल्यास उक्त नमुद जन्मतारीख व जन्मठिकाण याबाबत नोंद कायदेशीर असल्याबाबत त्यानुषंगाने विहित कार्यवाही करण्यात येईल.

आज दि. १९/१२/२०२४ रोजी माझे सही व शिक्यानिशी दिला.

**(स्वाक्षरीत)**
**कार्यकारी दंडाधिकारी**
**तथा तहसिलदार वडवणी**

शिक्का

---

## जाहीरनामा

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे कार्यालय वडवणी जि.बीड**

**जा.क्र.२०२४/दंड विभाग/जन्म नोंद/सं. नो. १९४,**

**जन्म-मृत्यु नोंदणी प्रमाणपत्र मिळणेबाबत**

**जन्म-मृत्यु नोदणी (सुधारणा) कायदा २०२३ मधील कलम ११ अन्वये**

सर्व जनतेस याद्वारे जाहीर केले जाते की, अर्जदार नामे **हारुन पि. इसाक कुरेशी, रा. खाटीक गल्ली वडवणी, ता. वडवणी, जि. बीड** यांनी त्यांचा मुलगा नामे आमेद हारुन कुरेशी याचा जन्म दिनांक २१/०३/१९९३ रोजी वडवणी, ता. वडवणी, जि. बीड येथे राहत्या घरी झाला असुन अर्जदार यांनी सदर जन्माची नोंद नगरपंचायत वडवणी, ता. वडवणी, बीड यांचे नोंदवहीमध्ये घेऊन प्रमाणपत्र मिळावे म्हणुन या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

करिता उक्त नमुद व्यक्तीची जन्मतारीख व जन्मठिकाण कायदेशीर नाही, असे कोणास या कार्यालयाचे निदर्शनास आणून द्यावयाचे असेल तर या जाहिरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत त्याने / तिने या कार्यालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात. तसेच सर्व जनतेस हेही कळविण्यात येते की, जर विहीत मुदतीत कोणी योग्य हरकती दाखल न केल्यास सदर कार्यालय अर्जदार यांच्या हक्काबदल पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत झाल्यास उक्त नमुद जन्मतारीख व जन्मठिकाण याबाबत नोंद कायदेशीर असल्याबाबत त्यानुषंगाने विहित कार्यवाही करण्यात येईल.

आज दि. १९/१२/२०२४ रोजी माझे सही व शिक्यानिशी दिला.

**(स्वाक्षरीत)**
**कार्यकारी दंडाधिकारी**
**तथा तहसिलदार वडवणी**

शिक्का

---

## जाहीरनामा

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे कार्यालय वडवणी जि.बीड**

**जा.क्र.२०२४/दंड विभाग/जन्म नोंद/सं. नो.- २०३,**

**जन्म-मृत्यु नोंदणी प्रमाणपत्र मिळणेबाबत**

**जन्म-मृत्यु नोदणी (सुधारणा) कायदा २०२३ मधील कलम ११ अन्वये**

सर्व जनतेस याद्वारे जाहीर केले जाते की, अर्जदार नामे **विमल भ्र.बाबासाहेब होंडे, रा. वडवणी, ता. वडवणी, जि. बीड** यांनी त्यांचा मुलगा नामे समाधान बाबासाहेब होंडे याचा जन्म दिनांक १२/०७/२००६ रोजी वडवणी, ता. वडवणी, जि. बीड येथे राहत्या घरी झाला असुन अर्जदार यांनी सदर जन्माची नोंद नगरपंचायत वडवणी, ता. वडवणी, बीड यांचे नोंदवहीमध्ये घेऊन प्रमाणपत्र मिळावे म्हणुन या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

करिता उक्त नमुद व्यक्तीची जन्मतारीख व जन्मठिकाण कायदेशीर नाही, असे कोणास या कार्यालयाचे निदर्शनास आणून द्यावयाचे असेल तर या जाहिरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत त्याने / तिने या कार्यालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात. तसेच सर्व जनतेस हेही कळविण्यात येते की, जर विहीत मुदतीत कोणी योग्य हरकती दाखल न केल्यास सदर कार्यालय अर्जदार यांच्या हक्काबदल पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत झाल्यास उक्त नमुद जन्मतारीख व जन्मठिकाण याबाबत नोंद कायदेशीर असल्याबाबत त्यानुषंगाने विहित कार्यवाही करण्यात येईल.

आज दि. १९/१२/२०२४ रोजी माझे सही व शिक्यानिशी दिला.

**(स्वाक्षरीत)**
**कार्यकारी दंडाधिकारी**
**तथा तहसिलदार वडवणी**

शिक्का

---

## जाहीरनामा

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे कार्यालय वडवणी जि.बीड**

**जा.क्र. २०२४ / दंड विभाग/जन्म नोंद/सं. नो.- २१५,**

**जन्म-मृत्यु नोंदणी प्रमाणपत्र मिळणेबाबत**

**जन्म-मृत्यु नोदणी (सुधारणा) कायदा २०२३ मधील कलम ११ अन्वये**

सर्व जनतेस याद्वारे जाहीर केले जाते की, अर्जदार नामे **लहू पि. अभिमन्यू मुंडे, रा. वडवणी, ता. वडवणी, जि. बीड** यांनी त्यांचा मुलगा नामे सोमनाथ लहू मुंडे याचा जन्म दिनांक १०.१०.२००७ रोजी वडवणी, ता. वडवणी, जि. बीड येथे राहत्या घरी झाला असुन अर्जदार यांनी सदर जन्माची नोंद नगरपंचायत वडवणी, ता. वडवणी, बीड यांचे नोंदवहीमध्ये घेऊन प्रमाणपत्र मिळावे म्हणुन या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

करिता उक्त नमुद व्यक्तीची जन्मतारीख व जन्मठिकाण कायदेशीर नाही, असे कोणास या कार्यालयाचे निदर्शनास आणून द्यावयाचे असेल तर या जाहिरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत त्याने / तिने या कार्यालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात. तसेच सर्व जनतेस हेही कळविण्यात येते की, जर विहीत मुदतीत कोणी योग्य हरकती दाखल न केल्यास सदर कार्यालय अर्जदार यांच्या हक्काबदल पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत झाल्यास उक्त नमुद जन्मतारीख व जन्मठिकाण याबाबत नोंद कायदेशीर असल्याबाबत त्यानुषंगाने विहित कार्यवाही करण्यात येईल.

आज दि. १९/१२/२०२४ रोजी माझे सही व शिक्यानिशी दिला.

**(स्वाक्षरीत)**
**कार्यकारी दंडाधिकारी**
**तथा तहसिलदार वडवणी**

शिक्का

# रस्त्यांच्या मध्येच विद्युत रोहित्र; उघड्या रोहित्रांमुळे दुर्घटनेची भिती



## महावितरण व नगरपालिकेच्या निषेधार्थ लक्ष्यवेधी बोंबाबोंब आंदोलन : डॉ.गणेश ढवळे

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरात शासनाच्या नगरोत्थान सुवर्ण जयंती टप्पा क्रमांक १ मधुन ७० कोटी रूपयांची आणि टप्पा क्रमांक २ मध्ये ६९ कोटी रुपयांची अशी एकूण जवळपास १४० कोटी रुपयांची ६० फुट रूंदीचे सिमेंट रस्ते व नाल्यांची कामे करण्यात आली.मात्र

रस्त्यांच्या मध्यभागी महावितरणचे विद्युत पोल व विद्युत रोहित्रांमुळे ईतरत्र हलविण्यासाठी निधीची तरतूद करण्यात आली नाही. नगरपालिका आणि महावितरण एकमेकांकडे बोट दाखवत जबाबदारी टाळत आहेत. रस्त्यांच्या मध्यभागी असणाऱ्या महावितरणचे पोल व विद्युत रोहित्रांमुळे रस्त्याने जाणाऱ्या वाहनांना वाहतुकीस अडथळा व अपघाताचा धोका निर्माण झाला असुन विद्युत पोल व रोहित्र ईतरत्र सुरक्षित ठिकाणी हलविण्यात यावेत या प्रमुख मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली आज दि.२३ सोमवार रोजी नगरनाका ते कृषी कॉलनी दरम्यान तुळजाई चौक याठिकाणी नगरपालिका व महावितरणच्या निषेधार्थ बोंबाबोंब आंदोलन करण्यात आले. निवेदन जिल्हाधिकारी बीड , मुख्याधिकारी नगरपालिका बीड यांच्या मार्फत मुख्यमंत्री, ऊर्जा मंत्री यांना देण्यात आले यावेळी शेख युनुस,सुदाम तांदळे, शिवशर्मा शेलार, हरिओम क्षीरसागर,शिवशक्ती भिमशक्ती विचारमंचचे प्रदेशाध्यक्ष



बाळासाहेब मोरे आणि नागरीक उत्तमराव मिसाळ,मुकुंद भुतपल्ले, वालचंद चाटे,मोहन खरमाटे, गणेश वाघ, महावीर बोरा, विनायक घोळवे,रामराजे राक्षसभुवनकर, महेश मेहेत्रे, डॉ.मोरे, ज्ञानेश्वर राऊत, ओंकार जोशी, नामदेव वाघ, प्रविण कुलकर्णी,सारंग जोशी,विजय काटे, इंजिनिअर घोळवे, श्रीरंग शिंदे, रविंद्र पौळ आदी सहभागी होते. बीड शहरात गेल्या २ वर्षांपासून नगरोत्थान सुवर्ण जयंती टप्पा क्रमांक १ मधुन ७० कोटी आणि टप्पा क्रमांक २ मधुन ६९ कोटी रुपयांची एकुण जवळपास १४० कोटी रूपयांची ६० फुट रूंदीचे सिमेंट रस्त्यांची व नालींची कामे करण्यात आली. रस्ते व नाली बांधकामास निधी मिळाला मात्र रस्त्यावरील पोल व वीज रोहित्र ईतरत्र हलविण्यासाठी निधीची तरतूद नसल्याने स्थलांतरित करण्यात आले नाहीत.परंतु रस्त्याच्या मध्ये वाहतुकीस अडथळा व अपघाताला निमंत्रण ठरणा-या रोहित्र आणि विद्युत खांब काढण्याची तसदी संबंधित विभागाने घेतली नाही. बीड शहरातील नगरनाका ते कृषी कॉलनी दरम्यान असणाऱ्या रस्त्यावरच तुळजाई चौकाच्या पुढे जागोजागी महावितरण चे विद्युत पोल असून ते एका सरळ रेषेत नाहीत. त्यातच एसबीआय बँकेच्या जवळ असणाऱ्या विद्युत रोहित्रांनी रस्त्याच्या मधोमध स्थान मांडलेले असून रस्त्याने जाणाऱ्या वाहनांना अपघाताचा मोठा धोका निर्माण झाला आहे. नगर नाका ते कृषी कॉलनी हा अत्यंत महत्त्वाचा मार्ग आहे. या रस्त्यावर नाट्यगृह ,अनेक दवाखाने, वाचनालय ,शाळा यांच्यासह अनेक खाजगी शिकवण्या आहेत. एसबीआय बँकेची शाखा याच मार्गावर असल्यामुळे विद्यार्थ्यांचे तसेच नागरिकांची मोठ्या प्रमाणात वर्दळ या रस्त्यावर असते. मध्यंतरी या रस्त्याचे काम करून हा रस्ता सिमेंटचा बनविण्यात आला. परंतु रस्त्याच्या मधोमध धोकादायक स्थितीमध्ये असणारे विद्युत रोहित व खांब असल्याने ते देखील कललेल्या स्थितीत आहेत. त्याच्या चोहींकडुन लटकणाऱ्या विद्युत तारांमुळे नागरिकांची मोठे गैरसोय होत असून त्या ठिकाणी अपघात होण्याची भीती निर्माण झाली आहे .रस्त्याच्या मध्येच विजेचे रोहित्र असल्यामुळे अनेक वेळा वाहनधारकांना समोरून येणारे वाहन ब-याच वेळा लक्षात येत नाही .त्यामुळे अपघात देखील झालेले आहेत .त्यामुळे हे विजेचे खांब आणि रोहित रस्त्याच्या एका बाजूला घेऊन लटकणाऱ्या तारा सुव्यवस्थेत करून नागरिकांना होणाऱ्या गैरसोयीतून मुक्त करण्यात यावे.अशी या भागातील नागरिकांची मागणी आहे.

बीड शहरातील यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, राजीव गांधी चौक, बार्शी नाका ,केएसके महाविद्यालय,आदी ठिकाणी सुद्धा रस्त्याच्या मधोमध विद्युत रोहित्र,विद्युत खांब,फोनची डीपी आदी वाहतुकीस अडथळा व अपघाताला निमंत्रण देणारी असुन नगरपालिका व सार्वजनिक बांधकाम विभाग याबाबत आवश्यक उपाययोजना करत नाही त्यामुळे रोहित्र सुरक्षित ठिकाणी हलविण्यात यावेत



उद्योजता गिराम पाटील यांच्या नवीन घराच्या वास्तू शांतीच्या कार्यक्रमास उपस्थित राहून शुभेच्छा देताना दैनिक मराठवाडा पत्र चे संपादक दत्तात्रय नरनाळे, ॲड. गोविंद शिराळे.

# आरोग्य मंत्री मेघना बोर्डीकर यांची माधव निर्मळ यांच्याकडे सदिच्छा भेट

**दिंद्रुड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्याच्या आरोग्य मंत्री नामदार मेघना बोर्डीकर यांनी माजलगाव विधानसभा मतदार संघाचे नेते माधव निर्मळ यांच्या धारूर येथील निवासस्थानी सदिच्छा सोमवारी सदिच्छा भेट दिली. नामदार मेघना बोर्डीकर या सोमवारी सायंकाळी मस्साजोग येथील मयत सरपंच संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांना भेटण्यासाठी आल्या होत्या. या दौऱ्यात धारूर येथील माधव निर्मळ यांच्या घरी बोर्डीकर यांनी सदिच्छा भेट दिली. सौ. अपर्णा व माधव



निर्मळ यांच्यासह परिवाराने मेघना बोर्डीकर यांचे राज्यमंत्रीपद मिळाल्याबाबत अभिनंदन करत शुभेच्छा दिल्या. सौ अपर्णा निर्मळ या मेघनाताई बोर्डीकर यांच्या मतदारसंघातील झरीबोरी या गावचे आहेत. दोघींचेही मैत्रीचे संबंध असल्याने ही भेट होती असे सांगण्यात येते. माधव निर्मळ यांनी धारूर येथील ग्रामीण रुग्णालयात कायमस्वरूपी वैद्यकीय अधीक्षक व रुग्णालयासाठी वाढीव खाटांची मागणी याप्रसंगी नामदार मेघनाताई बोर्डीकर यांना केली.या प्रसंगी राजेभाऊ निर्मळ अक्षय मुंदडा, जिल्हा चिकित्सालय प्रमुख डॉ अशोक थोरात, सुरेश भुमरे,बाळासाहेब गायकवाड, राजू शेठ कोमटवार, महादेव शिनगारे,सादिक इनाम दार, अनिलराव शेळके, महादेव शेळके, शिवाजी काळे, रंजीत रूपनर ,प्रकाश जाडकर, सोरभ निर्मळ उपस्थित होते.

# उमरद खालसा शाळेची शैक्षणिक सहल संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

जि. प .प्रा. शाळा उमरद खालसा तालुका बीड येथील शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील शैक्षणिक सहल संपन्न झाली यामध्ये विद्यार्थ्यांना विविध ऐतिहासिक, भौगोलिक स्थळांची प्रत्यक्ष माहिती मिळावी यासाठी त्यांना त्या परिसरात घेऊन जाऊन या ठिकाणच्या ऐतिहासिक व भौगोलिक परिस्थितीचा प्रत्यक्ष अनुभव देणे गरजेचे असते त्यासाठी विद्यार्थ्यांची महाराष्ट्रातील थंड हवेचे ठिकाण महाबळेश्वर , प्रतापगड,छत्रपती शिवाजी राजांची राजधानी रायगड महाड येथील चवदार तळे आळंदी देवाची पुणे येथील केतकावळे प्रति बालाजी मंदिर व जेजुरी गड या ठिकाणी नेण्यात आली यासाठी ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी



माटे साहेब व केंद्रप्रमुख जलील सर यांचे सहकार्य लाभले शाळेचे मुख्याध्यापक जोशी सर यांच्या नेतृत्वाखाली व जेष्ठ सहशिक्षिका आदरणीय गवते मॅडम यांच्या खंबीर नेतृत्वामुळे तसेच जोगदंड सर ,वाघमारे मॅडम, पवार मॅडम व क्षीरसागर सर यांच्या सहकार्याने सहल संपन्न झाली सहलीतील अनुभव सांगायचा झाला तर एकच तो म्हणजे त्या निरागस बालकांच्या चेहऱ्यावरील आनंद सगळे काही सांगून जात होता असे मत गवते मॅडम यांनी व्यक्त केले शैक्षणिक सहलीसाठी प्रत्यक्ष अप्रत्यक्ष सहकार्य लाभले त्या सर्वांचे शाळेच्या वतीने खूप खूप धन्यवाद.



बीडचे नुतन पोलीस अधीक्षक नवनीत कावत सर यांनी आज पदभार स्वीकारला असता त्यांचे सत्कार करून स्वागत करताना सामाजिक कार्यकर्ते अशोक दादा ढोले व युवा कार्यकर्ते प्रकाश तावरे दिसत आहे.



बीड जिल्ह्याचे नुतन पोलिस अधीक्षक नवनीत कॅवत साहेब यांनी पदभार स्वीकारला असता त्यांची सदिच्छा भेट घेऊन सत्कार करताना शिवसेनेचे युवा नेते विपुल भैय्या पिंगळे.

# स्व. संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांना मोरवड ग्रामस्थांची ६० हजार रुपयांची आर्थिक मदत



## सामाजिक बांधिलकी जपली पाहिजे: सरपंच विवेक अंडील

**बीड । प्रतिनिधी**

संपूर्ण महाराष्ट्रामध्ये स्व संतोष देशमुख यांच्या हत्यानंतर संपूर्ण महाराष्ट्रामध्ये देशामध्ये हळहळ व्यक्त केले जात आहे, सरपंच देशमुख यांची हत्या क्रूर पद्धतीने केली गेली आहे, हे संपूर्ण महाराष्ट्राने पाहिले परंतु एक आदर्श गाव बनवण्याचे स्वप्न घेऊन चाललेला सरपंच गेल्यानंतर संपूर्ण कुटुंब उघड्यावर आल्याचे आपल्याला दिसते आहे, एका व्यक्तीची अशा पद्धतीने निर्गुण हत्या करणे हे माणुसकीला काळीमा फासणारी अत्यंत चुकीचे कृत्य आहे. अशा वेळी सामाजिक बांधिलकी म्हणून आपण साथ दिली पाहिजे, आपल्या पद्धतीने आपण जे काही करू शकतो ते योगदान आपण दिले पाहिजे. सामाजिक बांधिलकी जपली पाहिजे हीच सामाजिक बांधिलकी जपत असताना मोरवड ग्रामस्थांनी ६० हजार रुपये मदत करून मदतीचा हात पुढे केला आहे. आपणही मदत करावी असे आवाहन मोरवड गावचे सरपंच विवेक अंडील यांनी बोलताना केले आहे.

# लिंबारुई देवी येथील शेतकऱ्यावर प्राणघातक हल्ला



**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील पिंपळनेर हद्दीत लिंबारुई देवी येथील शेतकरी जगन्नाथ ज्ञानोबा नांदे वय वर्षे ५५ यांच्या वर अज्ञात व्यक्तीने रात्री च्या सुमारास अंधाराचा फायदा घेऊन शेतात प्राणघातक हल्ला चढवला आणी बेदम मारहाण करून मोटार सायकल जाळली असल्याची घटना पिंपळनेर पोलिस स्टेशन हद्दीतील लिंबारुई देवी येथे घडली आहे. सदरील घटनास्थळी पिंपळनेर पोलीस अधिकारी व कर्मचारी दाखल झाले आहेत.

